# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्रमांक १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.
दू. क्र. : ०२२ ६६४०५०६६, ६६४०६०६७, ६६४०५०७७ Email Id – cpromhada@gmail.com

जा.क्र.जसंवि/प्रसिद्धी पत्रक/२९१६ दि. ०१/१०/२०२१

प्रसिद्धी पत्रक

कोंकण मंडळ सदनिका सोडत- २०२१

# स्वीकृत अर्जांची प्रारुप यादी ६ ऑक्टोबरला प्रसिद्ध होणार

मुंबई, दि. ०१ ऑक्टोबर, २०२१ :- कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे (म्हाडाचा विभागीय घटक) ८ हजार ९८४ सदनिकांसाठी जाहीर संगणकीय सोडतीचे सुधारित वेळापत्रक पुन्हा जाहीर करण्यात आले असून या नवीन वेळापत्रकात स्वीकृत अर्जांच्या प्रारुप यादीची प्रसिद्धी, प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यापासून दावे-हरकती दाखल करणे, सोडतीसाठी स्वीकृत अर्जांच्या अंतिम यादीची प्रसिद्धी याबाबतच्या तारखांमध्ये बदल करण्यात आला आहे.

सुधारित वेळापत्रकानुसार सोडतीसाठी स्वीकृत अर्जांच्या प्रारुप यादीची प्रसिद्धी https://lottery.mhada.gov.in व https://mhada.gov.in या म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळांवर ६ ऑक्टोबर, २०२१ रोजी सायंकाळी ६ वाजता केली जाणार आहे. प्रारुप यादीची प्रसिद्धी झाल्यापासून दावे-हरकती ७ ऑक्टोबर, २०२१ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत दाखल करता येणार आहेत. सोडतीसाठी स्वीकृत अर्जांच्या अंतिम यादीची प्रसिद्धी म्हाडाच्या https://lottery.mhada.gov.in व https://mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळांवर ८ ऑक्टोबर, २०२१ रोजी सायंकाळी ६ वाजता केली जाणार आहे, अशी माहिती कोंकण मंडळाचे मुख्य अधिकारी डॉ. नितीन महाजन यांनी दिली.

संगणकीय सोडतीचा कार्यक्रम यापूर्वी निश्चित झाल्याप्रमाणे दि. १४ ऑक्टोबर, २०२१ रोजी सकाळी १० वाजता डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह, हिरानंदानी मेडोस जवळ, मानपाडा, ठाणे (पश्चिम) येथे होणार असल्याचे डॉ. महाजन यांनी सांगितले.

(सही/-)
(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्राधिकरण